# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १३.०९.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १२.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून एकुण ७,६५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०५ केसेसमध्ये ३१ इसमांवर कारवाई करून एकुण ११,७८,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,१९७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ६,०९,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

दिनांक १२.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १३.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०९ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एमडी पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०९.२०२६ चे ००.२० वा. ते ०२.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, बुध्दनगर, प्रितमसिंग ठाकूरचे घरासमोर रोडलगत सापळा रचून एका संशयीत इसमास त्याचे मेस्त्रो मोपेडसह ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव अनुराग राजेश रामटेककर वय २३ वर्षे रा. युनिट—२, बुध्दनगर, हनुमान मंदीरजवळ, खोब्रागडेचे घरी किरायाने, पाचपावली, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून,एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण १२ ग्राम ६५० मिलीग्राम एम. डी. पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एमडी पावडर, ०१ मोबाईल, एक वजनकाटा व मेस्त्रो मोपेड असा एकुण ९३,४५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद एमडी पावडर ही त्याचे साथीदार पाहीजे आरोपी नामे १) जावेद खान वय ३० वर्षे रा. हसनबाग, नागपुर २) चंदा ठाकुर रा. शांतीनगर, नागपूर यांचेकडून विक्रीकरीता आनल्याचे त्याने सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे गुन्हा नोंदवुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगीरी :— दुकान फोडणाऱ्या आरोपींना अटक, एकुण ०२ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ३१.०७.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०१.०८.२०२६ चे ०३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सदर हद्दीत, गड्डीगोदाम, गोल बाजार येथील साईकृपा ट्रेडर्स नावाचे किराणा दुकानाचे शटर उचकावून, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानात प्रवेश करून, दुकानातील काऊंटर मधील रोख १०,०००/— रू. चोरून नेले होते. तसेच दिनांक १४.०८.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक १५.०८.२०२६ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सदर हद्दीत, गड्डीगोदाम, गोल बाजार येथील श्री गणेश किराणा भंडार नावाचे किराणा दुकानाचे शटर उचकावून, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानात प्रवेश करून, दुकानातील रोख ५,०००/— रू., ३ किलो हिरवी विलायची, ५ किलो काजु, ३ किलो बादाम असा एकूण २७,०००/— रु चा मुद्येमाल चोरून नेल्याने दुकानमालक फिर्यादी यांनी दिलल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सदर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी निष्पन्न करुन आरोपी नामे १) पियुष उर्फ डिजे नितेश सोनटक्के वय १९ वर्षे रा. प्लॉट क्र. ५८३, विनोबा भावे नगर, यशोधरानगर, नागपुर २) वृत्तांत दीपक द्रविडकर वय २१ वर्ष रा. प्लॉट क्र. ८७८, विनोबा भावे नगर, यशोधरानगर, नागपुर व एका विधीसंघर्षग्रस्ता बालक यांना ताब्यात घेतले. आरोपी व विधीसंघर्षग्रस्ता बालकाची विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद दोन्ही गुन्हे त्यांचे साथीदार पाहिजे आरोपी यांचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन रोख १,१५०/—रू., जप्त करण्यात आले आहेत. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



## (गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे शांतीनगर :— दुकान फोडुन चोरी करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, एनएमसी ऑफीसजवळ दहीबाजार येथे फिर्यादी यांचे परमात्मा एक मोबाईल शॉपी नावाचे मोबाईल खरेदीविक्रीचे दुकान आहे. दिनांक ११.०९.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक १२. ०६.२०२६ चे ०६.०९ वा. चे दरम्यान, फिर्यादी आपले दुकान बंद करुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटर उचकावून, दुकानात प्रवेश करून, काउंटरमधिल रोख १,१५,०००/—रू. तसेच, वेगवेगळे कंपनीचे १७ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती ६,२४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दुकानातील सीसीटिव्ही चेक केले असता, तीन अज्ञात चोरटयांनी चोरी केल्याचे दिसुन आले.

यापकरणी फिर्यादी राकेश चंद्रभान टाकळीकर वय ३४ वर्ष रा. नवी मंगळवारी, मेहंदीबाग रोड, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. अमित कुंभार ७७७६९२७२४४ यांनी अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कपीलनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १२.०९.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे भाऊ नामे स्वप्निल उर्फ आकाश पुरुषोत्तम चिंचखेडे वय ३५ वर्षे रा. प्लॉट क्र. २०६, अंगुलीमाल नगर, कपीलनगर, नागपुर हे त्यांचे रॉयल एनफिल्ड बुलेट क्र. एम.एच. ४० एयु ४७८७ ने पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, स्पर्श चाईल्ड डेंटल हॉस्पिटल, सुगतनगर कडे जाणारे रोडवरील वस्तीतुन जात असतांना, महानगर पालिकेचा पाण्याचा टॅकर क्र. एमएच ४९ सी ४६६५ चा चालक नामे शैलेष अनिल गजभिये वय २४ वर्ष रा. बिल्डींग क्र. ११, म्हाडा कॉलनी, नारी रोड, नागपूर त्याचे ताब्यातील टॅकर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन बुलेटला ओव्हरटेक करतांना बुलेटला धडक देऊन फिर्यादीचे भावास गंभीर जखमी केले. लोकांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी उपचारादरम्यान त्यांना तपासुन मृत घोषित केले.

यापकरणी फिर्यादी हर्षल पुरुषोत्तम चिंचखेडे वय ४० वर्षे रा. प्लॉट क्र. २०६, अंगुलीमाल नगर, कपीलनगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि. रंजीत रणनवरे ८८०५५७२०६९ यांनी टॅकर चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**<u>पोलीस ठाणे लकडगंज</u>:—** राजेश गिरीजाशंकर पंडया वय ६२ वर्षे रा. फ्लॅट क्र. ३०६, जमना—२ सोसायटी, आंबेडकर चौक, नागपूर हे दिनांक ०१.०९.२०२६ चे १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे लकडगंज हद्दीतील कामधेनु गोशाळा, हनी लिसा अपार्टमेंट, एनएमसी झोन रोड येथून बेपत्ता झाले आहेत. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—निमगोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ७ इंच, केस—पांढरे वाढलेले, दाढी मिशी—पांढरी वाढलेली, अंगात— पिवळा कुर्ता व पांढरा पायजामा, गळयात केसरी गमछा घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळख— कपाळावर नेहमी लाल रंगाचा टिळा लावतात



राजेश

स्वा/—

( नितीन चुलपार )
सहा.पोलीस निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.